मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडमध्ये होणार नाट्य संकुल

## अजित पवार यांची घोषणा; अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त मान्यवरांचा सन्मान

**पिंपरी | प्रतिनिधी**

नाटक हे मराठी माणसांचा श्वास आहे, मराठी माणसांनी संस्कृती जपली आहे. कामगार, औद्योगिक नगरी अशी ओळख असलेल्या पिंपरी चिंचवड शहराचा सांस्कृतिक नगरी म्हणून झपाट्याने विकास होत आहे, यामध्ये नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांचा मोलाचा वाटा आहे, मी त्यांनी मागणी केल्या प्रमाणे शहरात नाट्य संकुल करण्यास अनुकूल असून त्यांनी सोमवारी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची भेट घ्यावी, मी त्यांना फोनवर बोलून जागा उपलब्ध करून देण्याची सूचना देतो असे सांगत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शहरात नाट्य संकुल उभारण्याची घोषणा केली.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखेच्या २९ व्या वर्धापन दिनानिमित्त प्रा. रामकृष्ण मोरे नाट्यगृहात आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात उपमुख्यमंत्री अजित पवार बोलत होते. या प्रसंगी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मध्यवर्ती संघटना, मुंबई चे विश्वस्त अशोक हांडे हे या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. १०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष अजितदादा होते मात्र संमेलनाला येऊ न शकल्यामुळे त्यांचा मध्यवर्ती शाखेचे विश्वस्त अशोक हांडे,उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर आणि नियामक मंडळाचे सदस्य सुहास जोशी यांच्या हस्ते त्यांना स्मृती चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.



या प्रसंगी 'कै. बालगंधर्व पुरस्कार' – श्री ज्ञानेश पेंढारकर (ज्येष्ठ नाट्य संगीतकार), आचार्य प्र.के. अत्रे पुरस्कार' – श्री संकर्षण कऱ्हाडे (अभिनेता,कवी, लेखक, निवेदक), 'कै. अरुण सरनाईक पुरस्कार' – प्रवीण तरडे (अभिनेता, लेखक, दिग्दर्शक) , 'कै.स्मिता पाटील पुरस्कार' – स्पृहा जोशी (कवयित्री,अभिनेत्री,निवेदिका) ,'कै. जयवंत दळवी पुरस्कार' – अरविंद जगताप (नाट्य-सिने-मालिका लेखक) आणि ज्येष्ठ शास्त्रीय गायक पं. सुरेश साखवळकर यांचा नाट्य परिषद मध्यवर्तीचा'जीवन गौरव पुरस्कार' मिळाल्यानिमित्त यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. तसेच सुवर्णा काळे, रति देशमुख, संदीप उर्फ जम्माड देशमुख, संदीप उर्फ बबलू जगदाळे, सोमनाथ तरटे,राष्ट्रीय खेळाडू प्रांजल जाधव यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच राज्यनाट्य स्पर्धा २०२४ चे पुरस्कार विजेत्यांनाही यावेळी सन्मानित करण्यात आले यामध्ये मनोहर जुवाटकर,कमलेश बिचे, विनायक परदेशी, अथर्व कुलकर्णी, श्रुती भोसले, दिनेश साबळे यांचा समावेश होता.

पुढे बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, संयुक्त महाराष्ट्राचा सुवर्ण कलश आणणारे राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी कला व संस्कृती जपणाऱ्या कलाकारांनी योग्य मान सन्मान दिला, राज्याची संकृती जपण्याचे काम या लोकांनी केले. चव्हाण साहेबांचा आदर्श घेऊन आम्ही सांस्कृतिक क्षेत्राच्या समस्या सोडवण्याच्या, कलावंत, साहित्यिकांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करत असतो, राज्यकर्ते म्हणून ते आमचे कर्तव्य आहे.

पुरस्कार मिळालेल्या सर्व कलावंताचे अभिनंदन करताना अजित पवारांनी संकर्षण कऱ्हाडे यांच्या एका व्हायरल कवितेचा संदर्भ घेत मी शेतकरी असून आजही शेतात राबतो मी पोल्ट्रीत पण काम केले आहे भाऊसाहेब भोईर तेव्हा लहान होते त्यांचे वडील सोपानराव भोईर यांनी पाहिले आहे.असे नमूद केले. मी ठरवून राजकारणात आलो नाही, माझ्या स्पष्ट बोलण्याने मी राजकारणात टिकणार नाही असे अनेकांचे मत होते मात्र माझा हाच स्वभाव सामान्य जनतेला भावणार याची मला सल्ला देणाऱ्यांना कल्पना नसावी असेही त्यांनी नमूद केले.

पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरात वाहतूक कोंडी होत असून ती सोडवण्यासाठी प्रयत्नशील आहोत असे सांगताना अजित पवार म्हणाले शहरात उड्डाणपूल, मेट्रो , रिंग रोड आणि राष्ट्रीय महामार्ग यांचे जाळे तयार करण्यात येत आहे. वाहतूक कोंडीचा सर्वांना त्रास होतो, वेळ वाया जातो लवकरच यावर तोडगा निघेल असे त्यांनी सांगितले.

# सायन्स पार्कमध्ये रोबोटिक्स प्रयोगशाळा कार्यान्वित

## विद्यार्थ्यांसाठी ॲडव्हान्स कॉम्प्युटर लॅबही सुरू, सप्ताहांत कार्यशाळांतून प्रत्यक्ष अनुभवाची संधी

**पिंपरी | प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला चालना देण्यासाठी पिंपरी-चिंचवड सायन्स पार्क येथे लीडरशिप फॉर इक्विटी आणि रोबोटेक्स इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने अत्याधुनिक रोबोटिक्स प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रयोगशाळेचे उद्‌घाटन महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते झाले.

सायन्स पार्कचे संचालक प्रवीण तुपे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रद्धा खापरिया, लीडरशिप फॉर इक्विटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी मधुकर रेड्डी बानुरी, मुख्य कार्यपालन अधिकारी दामिनी माईणकर, रोबोटेक्स इंडियाच्या कार्यपालन प्रमुख मनीषा सावंत यावेळी उपस्थित होते.

'विद्यार्थ्यांना विज्ञान, तंत्रज्ञान, नवोन्मेष आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) जगाचा प्रत्यक्ष अनुभव देऊन त्यांची कौशल्ये वृद्धिंगत करण्यासाठी रोबोटिक्स प्रयोगशाळा उपयुक्त ठरणार आहे. ही प्रयोगशाळा केवळ तंत्रज्ञान शिकवणारी नसून, विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव देणारी, समस्या सोडवणारी




आणि भविष्यातील अर्थव्यवस्थेत आत्मविश्वासाने सहभागी होण्यासाठी प्रेरणा देणारी आहे. या प्रयोगशाळेतून विद्यार्थ्यांना रोबोटिक्स, इलेक्ट्रॉनिक्स आणि प्रोग्रॅमिंगचे प्रशिक्षण मिळून नवकल्पना विकसित करणे शक्य होईल. रोबोटिक तंत्रज्ञानामुळे अचूकता, गती आणि विश्वासार्हता वाढली आहे. विद्यार्थ्यांनी नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करून तंत्रज्ञानासोबत जगायला शिकले पाहिजे, असे आयुक्त सिंह यांनी सांगितले.

दामिनी माईणकर म्हणाल्या, 'रोबोटिक्स प्रयोगशाळेमुळे विद्यार्थ्यांना आणखी संधी उपलब्ध होणार आहेत. या प्रयोगशाळेच्या मदतीने विद्यार्थी रोबोटिक्स आणि प्रोग्रॅमिंग अधिक सखोलपणे शिकून नवकल्पनांना मूर्त रूप देऊ शकतील. दृष्टिकोन अधिक व्यापक करू शकतील.'

'या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना विविध रोबोटिक्स स्पर्धांसाठी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. उद्योजकता आव्हान, लाईन फॉलोअर, मेझ सॉल्व्हर आणि गर्ल्स फायर फाईट यांसारख्या स्पर्धांमध्ये सहभागामुळे विद्यार्थ्यांची तांत्रिक क्षमता वाढेल तसेच संघभावना, नेतृत्वगुण आणि समस्या सोडवण्याचे कौशल्यही विकसित होईल', असे मनीषा सावंत यांनी नमूद केले.

'या उपक्रमाचे सातत्य टिकवण्यासाठी शिक्षक, प्रशिक्षण व मार्गदर्शन कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. निवडक शाळांतील शिक्षकांना विशेष प्रशिक्षण दिले जाईल.' असे डॉ. श्रद्धा खापरिया यांनी सांगितले.

# 'द्रुतगती'वर वाहतूक नियम तोडणारे कचाट्यात

## वर्षभरात 27 लाख 76 हजार ई-चलनांद्वारे 470 कोटींचा दंड, 51 कोटी 32 लाखांची वसुली

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर वाहतुकीचे नियम तोडणाऱ्या जवळपास २७ लाख ७६ हजार वाहनांवर दंड ठोठावण्यात आला आहे. यात तब्बल ४७० कोटी रुपयांचे ई-चलन जारी करण्यात आले आहे. इंटेलिजेंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टिमच्या (आयटीएमस) मदतीने गेल्या वर्षभरात ही कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, दंडापैकी ५१ कोटी ३२ लाखांची वसुली झाली आहे.

द्रुतगती मार्गावर कारसाठी १०० किमी प्रतितास आणि अवजड वाहनांसाठी ८० किमी प्रतितास वेगमर्यादा आहे. तर खंडाळा घाट विभागात हीच वेगमर्यादा कारसाठी ६० किमी प्रतितास व अवजड वाहनांसाठी ४० किमी प्रतितास आहे.

सुमारे ९५ किलोमीटच्या द्रुतगती मार्गावर नियमांचे पालन व्हावे आणि अपघात कमी करण्यासाठी राज्य सरकारने कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) चलित कॅमेरे आणि डिटेक्शन टूल्स असलेली 'आयटीएमएस' प्रणाली राज्य सरकारने जुलै २०२४ पासून कार्यान्वित केली आहे.

लोणावळा, खंडाळा ते खालापूर हा १० किलोमीटर उतार असलेल्या खंडाळा घाट विभागात सर्वाधिक दंड आकारला गेला आहे. दरम्यान, बोरघाटातील प्रवास अगोदरच मंदगतीने होत आहे. त्यातच वाढत्या दंडामुळे वाहनधारकांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे.

गेल्या वर्षी १९ जुलै ते ३१ डिसेंबरदरम्यान ८ लाख ८४ हजार ई-चलन जारी करण्यासाठी 'आयटीएमएस' ऑपरेटर प्रोटेक सोल्युशन्स एलएलपी कंपनीला ५७.९४ कोटी रुपये देण्यात आले आहेत. या ऑपरेटरला प्रत्येक ई-चलन जारी करण्यासाठी ६५४.९० रुपये देण्यात आले आहेत, अशी माहिती वाहतूकदार के. व्ही. शेट्टी यांनी दिली.



### 'आयटीएमस'मध्ये या बाबींचा समावेश

- ४० गॅन्ट्री आणि शेकडो सीसीटीव्ही
- स्पीड डिटेक्शन कॅमेरे
- ऑटोमॅटिक नंबर प्लेट रेकग्निशन
- वेट-इन-मोशन सेन्सर्स
- वाहन वर्गीकरण प्रणाली
- हवामान सेन्सर्स आणि डायनॅमिक मेसेजिंग सिस्टम
- सेंट्रल कमांड अँड कंट्रोल सेंटर (सीसीसी)

### वाहनाचा प्रकार आणि ई-चलन संख्या

- कार १७.२० लाख
- अवजड मालवाहतूक वाहने ३.२७ लाख
- बस (अवजड प्रवासी वाहने) २.४८ लाख
- टॅक्सी २ लाख
- हलकी मालवाहतूक वाहने १ लाख २० हजार
- मध्यम मालवाहतूक ८५ हजार ४६८
- आर्टिक्युलेटेड ट्रक ३० हजार ४५०
- बस (मध्यम प्रवासी वाहने) १४ हजार ७६४

# सोसायटी फेडरेशनच्या वतीने विजयनगर येथे वृक्षारोपण संपन्न

## काळेवाडी सोसायटी फेडरेशनच्या वतीने माध्यमातून अनेक देशी वृक्षांचे रोपण

**पिंपरी | प्रतिनिधी**

काळेवाडी सोसायटी फेडरेशनच्या वतीने आज विजयनगर येथील खेळाच्या मैदानावर वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी फेडरेशनच्या माध्यमातून अनेक देशी वृक्षांचे रोपण करण्यात आले.

या कार्यक्रमाला विजयनगर परिसरातील सर्व सोसायटींचे चेअरमन, सेक्रेटरी, सभासद आणि नगरपालिकेचे उद्यान विभागाचे अधिकारी उपस्थित होते. त्याचबरोबर माजी नगरसेविका विजया सुतार, युवानेते सचिन काळे, कोमल काळे, विजय सुतार, मल्लेश कद्रापुरकर, शिवसेना नेते सुधाकर नलवडे, संतोष कदम, प्रकाश लोहार, भरत ठाकूर, प्रदीप शिंदे, संदीप शिंदे, राहुल रोकडे, ओम क्षीरसागर, देवेंद्र जाधव यांसह राजकीय, सामाजिक क्षेत्रातील अनेकांनी हजेरी लावली.

सध्या सिमेंटच्या वाढत्या जंगलामुळे नैसर्गिक वायू देणाऱ्या वृक्षांची संख्या कमी होत आहे. विकासकांमांसाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करून निसर्गाची हानी होत आहे. त्यामुळे वृक्षारोपणसारख्या उपक्रमांमुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होते. वृक्ष ऑक्सिजन पुरवठा, हवामान नियंत्रण, मातीची घूप रोखणे आणि जैवविविधता जपण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. तसेच, वृक्षारोपणामुळे स्थानिक समुदायाला स्वच्छ हवा,



सावली आणि निसर्गाशी जोडले जाण्याची संधी मिळते असे मत उपस्थित मान्यवरांनी यावेळी व्यक्त केले.

या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी पर्यावरण रक्षणासाठी नियमित वृक्षारोपण आणि त्यांची जोपासना करण्याचा संकल्प केला. काळेवाडी सोसायटी फेडरेशनने या उपक्रमाद्वारे सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संरक्षणाचा आदर्श निर्माण केला आहे.